Printing Area
UGC
Jr.No.43053
UGC Approved Refereed Journal

Issue-48, Vol-02 April- 2018

ISSN 2394-5303

# Printing Area®

International Multilingual Refereed Research Journal




Editor
Dr.Bapu G.Gholap

40) महाराष्ट्रातील आंबेडकर पूर्व दलित राजकीय चळवळ - एक विश्लेषण ||173
डॉ.डोंगरे एल.डी.,जि.नांदेड.

41) जयवंत दळवी यांचे बॅरिस्टर नाटक - एक मानसशास्त्रीय दृष्टिकोण ||176
श्री. अभिषेक राजेंद्र परब, गोवा

42) प्राचीन ते ऊसतोडणी कामगारांच्या मुलांपर्यंत शिक्षण : एक अध्ययन ||183
प्रा.डॉ.कदम डी.के., जि.नांदेड.

43) An Analytical Study on Growth of Rural Banking System in the ||186
Dr. Rajvilas R. Karmore

44) श्रीरामचरितमानस में वर्णित सामाजिक एवं सांस्कृतिक शिक्षाओं की.... ||190
जितेन्द्र नाथ मिश्रा, चित्रकूट उ०प्र०

45) भारतीय संस्कृति में व्यक्तित्व की अवधारणा ||194
डॉ. मोना, हरिद्वार, (उत्तराखण्ड)



International Multilingual Research Journal

Printing Area

9850203295 7588057695

Editor Dr.Bapu G.Gholap


https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

42

# प्राचीन ते ऊसतोडणी कामगारांच्या मुलांपर्यंत शिक्षण : एक अध्ययन

प्रा.डॉ.कदम डी.के.
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर जि.नांदेड.

***********

ज्या देशातील मानवी संपत्ती सुजाण, सुसंस्कृत, सौजन्यशील आणि सुदृढ असते, तो देश श्रीमंत मानला जातो. शिक्षणानेच मानवाच्या अंगी हे गुण विकसीत होऊ शकतात. व्यक्तीगत जीवनात विद्या हेच माणसाचे भूषण आहे. मानवी जीवनाची मुहूर्तमेढ शिक्षणानेच रोवली जाते. मानवी जीवनात शिक्षणाला अतिशय महत्त्वाचे स्थान असून, शिक्षणाशिवाय मानवाचा विकास होऊ शकत नाही. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत मनुष्य सातत्याने अखंडपणे कोणत्या ना कोणत्या माध्यमातून शिकतच असतो.

मानवी जीवनात शिक्षणाला अनन्य साधारण महत्व असून, जीवनाचा अविभाज्य भाग असलेले शिक्षण हे शाळा, महाविद्यालयासारख्या औपचारीक शिक्षण संस्थांच्या माध्यमातून दिले जाते. कोणताही मनुष्य हा जन्मत: सुशिक्षीत नसतो. परंतु प्रयत्नपूर्वक त्याच्यावर शिक्षणाव्दारे मूल्य संस्कार करुन - त्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधता येतो. ज्ञानामुळे आत्मभान निर्माण करता येते. हे सर्व शिक्षणाशिवाय अशक्य आहे. शिक्षणामुळे प्रचंड ध्येयवाद, निर्भिडता, सुसंस्कृतपणा, कृतिप्रवणता, स्वावलंबन आणि खऱ्या अर्थाने स्वहिताचा व राष्ट्रहिताचा साकल्याने विचार करणारी व्यक्ती तयार होते. खऱ्या अर्थाने सभ्य सुसंस्कृत मनुष्य घडविणे, या सोबतच नैतिकतेची जोपासना कशी करावी, हे शिकविणे म्हणजे शिक्षण होय.

शिक्षण हया संस्कृत शब्दाचा अर्थच मूळ उपदेशाने बदल करणे हा होय. स्थळ, काळ परत्वे उपदेशाने सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास घडविण्याचे कार्य शिक्षणाव्दारे होत असते. व्यक्तिमत्वाचा विकास होणे म्हणजेच पर्यायाने जबाबदार नागरिक निर्माण करणे, चांगली माणसे घडविणे व सामाजिक बांधिलकी पत्करुन समाजसेवा करणे हे महत्वाचे कार्य शिक्षणातून होत असते. भौतिक जीवन सुखी, समृध्द व समाधानी होण्यासाठी शिक्षण अत्यंत आवश्यक आहे.

सुसंगत, समतोल व सर्वांगीण विकास शिक्षणाने साधता येतो. शरीराने बुध्दीशी मिळून काम करावे बुध्दीला भावनांची जोड असावी, भावनेवर नीतीचा संस्कार असावा, बुध्दीचा घा संयमाचा तिला लगाम असावा, भावना बुध्दीने निश्चित केलेले लक्ष्य चिकाटीने साधण्याची कार्यशक्ती असावी तरच व्यक्ती व पर्यायाने समाजाचा विकास होतो.छ शिक्षण ही मानवी समाजजीवनाची अत्यंत महत्वाची गरज आहे. बालकांना शिक्षणाच्या प्रक्रियेने हा सांस्कृतिक मूल्यांचा वारसा दिला जातो. अनेक संस्कारातून त्यांची मते घडवून नवीन पिढी निर्माण करण्याचे काम शिक्षण प्रक्रियेमुळेच होते.

प्राचीन काळातील गुरुकुल पध्दती ही विद्यार्थ्यांना सर्वंकष व गुणवत्तापुर्ण ज्ञान देणारी आदर्श व्यवस्था होती. च्भारतीय संस्कृतीने गुरुचे महत्व सदेव गायिले आहे. गुरुगृही रम्य, उदात्त, निर्मळ वातावरणात विद्येची उपासना चालत असे. स्फूर्तिदायक वातावरण, थोर चारित्र्य संपन्न आचार्यांचा सहवास, पोषक आहार व विहार यामुळे गुरुकुले ही विद्येच्या आराधनेची आदर्श स्थाने होती.

गुरुकुल पध्दतीत प्रत्येक विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता, आवड व गरज लक्षात घेऊन, गुरु त्यांच्यासाठी पोषक ठरणाऱ्या अभ्यासक्रमाची आखणी करीत. त्यात श्रम संस्कार, सदाचार, सत्य, अहिंसा, समता, स्नेह, आदर, प्रमाणिकपणा, सहकार्य, बंधुभाव या सर्व मुल्यांचा विकास गुरुकुलातील शिक्षणाने होत असे.

गुरुकुल पध्दतीमध्ये चारित्र्य संवर्धनावर जास्त भर दिला जात होता. काळाबरोबर गुरुकुलाची संकल्पना अस्तंगत होत गेली. शिक्षणातून मुलभूत मानवी गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व कौशल्यांचा विकास करणे हे ध्येय मानले गेले. शिक्षण हे रोजगार उपलब्ध करुन देणारे साधन बनत चालले आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मानवी मुलभूत गरजांची पूर्ती करणारे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहण्याची पध्दत दिवसेंदिवस वाढत आहे. आजपर्यंत जे ज्ञान प्रसंगोत्पात, सहजासहजी दिले जाई ते सहेतुकपणे व तंत्रशुध्द पध्दतीने देण्यास सुरुवात करण्याची आवश्यकता भासू लागली आहे.

च्व्यक्तिगत, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासासाठी बहूविध; परंतु अन्योन्यश्रेयी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वैयक्तिक व आर्थिक विकासाची भिन्न पातळीवरील, भिन्न भाषिक, भिन्न सामाजिक-सांस्कृतिक गुणधर्म असलेल्या लोकांसाठी सुयोग्य, एकात्मिक शैक्षणिक कार्यक्रम आखण्यासाठी एकच समान गाभा असणारा अभ्यासक्रम हवा.

स्वातंत्र्योत्तर काळात सर्व शिक्षण आयोगांनी शिक्षणावर भर दिला. राष्ट्राची प्रगती ही मुल्याधिष्ठीत जीवनानुभवातूनच होत असते.

समाजशील जीवन जगत असतांना आपली राहणी, रुढी, परंपरा, आचार-विचार यांचा समाजसंमत दृष्टीने विचार करावा लागतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला महत्व देतांना त्यांनी प्राथमिक शिक्षणाला महत्वाचे स्थान दिल्याचे दिसून येते. "प्राथमिक शिक्षणाचा सार्वजनिक प्रसार सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोडवल्यास प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्यास कैक शतके लागतील म्हणून शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा हवा, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत प्राथमिक शिक्षणाला महत्व दिले आहे. २६ जानेवारी १९५० रोजी स्वीकृत केलेल्या संविधानातील ४५ वे कलम हे प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात आहे. संविधान निर्माणापासून १० वर्षापर्यंत ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची बांधिलकी स्वीकारीत आहे. अशी भारतीय राज्यघटनेत तरतूद केली होती.

स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत १४ वर्षाखालील मुलांना प्राथमिक शिक्षण देखील आपण पुरवू शकलो नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या मार्गदर्शक तत्त्वाकडून मुलभूत हक्काकडं असा प्रवास १९९० नंतर वेगाने झाला. आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण हा मूलभूत अधिकार मानला. त्यामुळे ४५ व्या कलमाचा पूर्नविचार करण्यात आला. लोकसभेत २७ नोव्हेंबर २००१ व १४ मे २००२ च्या राज्यसभेत ९३ वी घटना दुरूस्ती एकमताने मंजूर करण्यात आली. त्यानुसार आता ६ ते १४ वयाच्या सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षण हा मुलभूत अधिकार ठरविला गेला. या नवीन विधेयकामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होऊन, सर्व शिक्षा अभियानांतर्गत मुलभूत हक्काची अंमलबजावणी होत आहे.

शैक्षणिक वर्ष १९९४-९५ ते १९९९-२००० पर्यंत जिल्हयात प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (D.P.E.P.) त्यानंतर शैक्षणिक वर्ष सन २००१ पासून सर्व शिक्षण मोहिम राबविली जात आहे. ६ ते १४ वयोगटातील मुलामुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अथक प्रयत्न चालू आहेत. ज्या विद्यार्थ्यांना नियमित शाळेत येणे घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे शक्य होत नाही, अशा मुलांसाठी पर्यायी शाळेची व्यवस्था करण्यात आली त्यात - (१) वस्ती शाळा (सुधारीत निर्णय, २२ जुले २००५.) (२) महात्मा फुले शिक्षण हमी योजना (प्राथमिक व उच्च प्राथमिक) २२ जुलै २००५. (३) महात्मा फुले शिक्षण हमी योजना (हंगामी स्थलांतरीत मुलांसाठी २२ जुलै २००५.) (४) राजीव गांधी संधी शाळा, (२ जुन २००५.) (५) हंगामी शाळा. (६) मदरसा मक्तब (७) उपचारात्मक अध्यापन वर्ग.

या शाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात आली. या मागचा प्रमुख उद्देश असा की, ६ ते १४ वयोगटातील सर्वच मुलांना प्राथमिक शिक्षण मिळावे, असे असले तरी आजही १००% पटनोंदणी, १००% उपस्थिती व १००% गुणवत्ता गाठणे शक्य झालेले नाही. ग्रामीण भागात सर्वच लोकांना वर्षभर पुरेल असे काम स्थानिक पातळीवर उपलब्ध नसते. म्हणून बरेच कुटूंब सुगीचे दिवस संपल्यानंतर साधारणतः ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी स्थलांतरीत होतात. यात ऊसतोड कामगारांच्या पाल्यांची समस्या शाळेच्या दृष्टीने फारच गंभीर आहे. ऊसतोडणी कामगारांची मुले पहिल्या सत्रापर्यंत शाळेत राहतात व दुसऱ्या सत्रात ती पूर्णपणे अनुपस्थित असतात. अशी मुले मे महिन्याच्या शेवटी आपल्या गावात येतात. त्यावेळी शाळांना सुटया असतात. मग अशा मुलांच्या शिक्षणाचा पर्यायाने भविष्याचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा बनला आहे.

"बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार कायदा लागू झाल्यानंतर शाळा सोडून जाण्याचे मुलांचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यास सुरुवात झाली असली, तरी पालकांसोबत रोजगाराच्या शोधात बाहेर पडलेल्या मुलांना शोधून त्यांना शालेय प्रवाहात सामील करुन घेणे जिकिरीचे काम बनले आहे. सर्वेक्षणात राज्यभरात अशी २ लाख शाळाबाहय मुले आढळून आली.

ग्रामीण भागात शेतमजूरीसाठी गेलेल्या आणि गावातून पालकांसोबत रोजगारांच्या शोधात बाहेर पडलेल्या मुलांचा मागोवा घेणे कठीण काम असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण परिषदेने शाळांमार्फत घेतलेल्या शोध मोहिमेत सन २०१२-१३ मध्ये राज्यात २ लाख शाळा बाहय मुले आढळून आली.

नांदेड जिल्हयात एकाही साखर कारखान्यावर वसतिगृहाची सुविधा नाही. कोणत्याही कारखान्याने शैक्षणिक सुविधा पुर्णपणे पुरविलेली नाही. कारखान्यांना शैक्षणिक सुविधेत वाढ करुन शैक्षणिक विकास करण्यास संधी आहे.

साखर कारखाने ऊसतोडणी कामगारांच्या पाल्याच्या शिक्षणाविषयी उदासीन असल्याचे दिसून येते. कारण साखर कारखान्यांनी साखर कारखान्यावर जी शाळा, महाविद्यालये स्थापन केली, त्या शाळात त्या कारखान्याच्या परिसरातील मुले शिक्षण घेतात. परंतु ऊसतोडणी कामगारांची मुले त्या शाळेत जाऊ शकत नाहीत. कारण ती मुले त्या शाळेपासून दूर कुठेतरी ऊसाच्या फडात राहतात. शिक्षणाशिवाय कोणतीही व्यक्ती आणि समाज, समृध्द, परिपूर्ण व स्वाभिमानी जीवन जगू शकत नाही.

सार्वजनिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद हा भारताच्या राष्ट्रीय शिक्षण पध्दतीतील एक अविभाज्य घटक मानण्यात आलेला आहे.

त्यामुळे प्राथमिक शिक्षणाच्या सोयीमध्ये बरीच वाढ केलेली दिसते. शिक्षण सार्वत्रिक करण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत.

महाराष्ट्र राज्य शासनाने सुरु केलेली सर्व शिक्षा अभियान योजना फलदायी ठरली आहे. याचे फल स्वरुप असे की, किमान २०० इतकी लोकसंख्या असलेल्या वस्तीसाठी १.५ कि.मी.परिसरात प्राथमिक शाळा सुरु झाल्या. त्यामुळे दुर्गम, डोंगराळ भाग, वाड्या, वस्त्या, तांडे अशा ठिकाणी शिक्षण पोहचल्याचे चित्र पाहायला मिळते.

ऊसतोडणी कामगारांच्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, स्थलांतरीत कुटुंबातील शाळेत जाणारे मुले-मुली त्यांच्या सोबत जाऊ नयेत, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था मूळ गावी व्हावी म्हणून गावातच ग्रामशिक्षण समितीने सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून त्या मुलांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था करावी. त्यासाठी लागणारा खर्च सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून करण्यात यावा अशी तरतूद शासनाने करुन स्थलांतरीत ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी हंगामी वसतिगृहाची व्यवस्था केली आहे.

चसर्व विद्यार्थ्यांचे पालक गावात नसल्यामुळे त्यांच्या बाबतीत अधिक जागरुकता ठेवावी. निवासाची व्यवस्था नीटनेटकी असावी शाळेच्या वेळा व्यतिरिक्त त्यांची काळजी घेण्यासाठी जबाबदारी सोपविण्यात आली. निवासाच्या ठिकाणी पाण्याचा होद असेल. विहीरीतून, तलावातून पाणी आणावयाचे, काढावयाचे असेल तर ते विद्यार्थ्यांना करायला लावू नये. शाळेच्या आधी भोजन तयार ठेवण्यात यावे. दुपारी शाळेतील मध्यान्ह भोजन व सायंकाळी दिलेल्या वेळेप्रमाणे भोजन द्यावे. स्वयंपाक उघडयावर ठेवू नये. सर्व अन्न झाकून व्यवस्थीत ठेवलेले असावे. शिळे अन्न खायला देऊ नये. मुल आजारी पडणार नाही यासाठी परिसर स्वच्छ ठेवावा. पिण्याचे पाणी गाळलेले, स्वच्छ असावे. मुल आजारी पडल्यास त्याचा ताबडतोब उपचार करावा. नजीकच्या आरोग्य केंद्रात अगर दवाखान्यात दाखवावे. आजार गंभीर असल्यास पालकास त्वरीत कळवावे.

महाराष्ट्र शासनाने २३ एप्रिल २००२ पासून हंगामी स्थलांतरीत होणाज्या कामगारांच्या ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाची सुविधा म्हणून वसतिगृहाची सुरुवात करण्यात आली. त्याबरोबरच ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी साखर कारखान्यावर साखर शाळा चालवल्या जात आहे. या योजनेचा एकमेव हेतू शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे आणि ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) ग.वि.अकोलकर व ग.ग.पाटील, शिक्षणाचा अर्थ व प्रयोजन, विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे.

२) ह.गो.चौधरी, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षक व शिक्षण सुविचार प्रकाशन मंडळ, सदाशिव पेठ, पुणे.

३) डॉ..आंबेडकर शिवराज - शैक्षणिक शास्त्र आणि मूल्यमापक (अभ्यास) प्रकाशन क्षितीज पब्लीकेशन, नागपूर.

४) दैनिक लोकसत्ता, राज्यातील दोन लाख शाळा बाह्य मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर दि. २३ जुलै २०१३.

५) हंगामी वसतिगृह योजना, सर्व शिक्षा अभियान, जि.प.नांदेड सन २०१०-१२.